# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**प्रेस नोट**

**दिनांक ०२/०५/२०२२ (सोमवार)**

**(सकाळ)**

---

**जबरी संभोग करणाऱ्या आरोपीला कोर्टातुन शिक्षा**

**पो.स्टे. नरखेड** :— दिनांक २७/०१/२०१६ चे २१.३० वा. दरम्यान फिर्यादी यांच्या रिपोर्ट वरुन पो.स्टे. नरखेड येथे अप. क्र. १२/२०१६ कलम ३७६, ३४ भादवी सहकलम ४, २ बाल लैगींक अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा नोंद झालेला होता.

दिनांक २४/०१/२०१६ चे १४.०० वा. ते १४.३० वा. चे सुमारास वय १७ वर्ष पीडित/फिर्यादी अल्पवयीन मुलगी ही गावा बाहेरून शौचास गेली असता परत येत असतांना आरोपी नामे— क्र. १. हितेश भागवत डाईजोड, वय २२ वर्ष, रा. बेलोना याने व सोबती आरोपीतांने संगणमत करून तिला रस्त्यात थांबवून 'तुला मोबाईल देतो' असे म्हणुन आरोपी क्र. १ याने जबरी संभोग केला. आरोपीला दिनांक २७/०१/२०१६ चे ११.१५ वा. दरम्यान अटक करण्यात आली.

सदर प्रकरण्याचे तपास तत्कालीन पोलीस निरीक्षक श्री. संदीप रनदिवे, पो.स्टे. नरखेड यांनी करून सदर प्रकरण न्याय प्रविष्ठाकरीता मा. कोर्टमध्ये सादर केले. दिंनाक ३०/०४/२०२२ रोजी मा. कोर्ट विद्यमान न्यायाधीश श्री. के. जी. राठी, न्यायाधिश, नागपूर यांनी आरोपी नामे— हितेश भागवत डाईजोड याला कलम ३७६ भादवी व कलम ३, ४ बाल लैगींक अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये १० वर्ष सश्रम कारावास व ५,०००/—रु. दंड व दंड न भरल्यास ६ महिन्याची सश्रम कारावास, कलम ५०६, ३४ भादवी मध्ये १ वर्ष सश्रम कारावास व २,०००/—रु. दंड व दंड न भरल्यास २ महिन्याची सश्रम कारावासाची शिक्षा ठोठावली आहे.

सरकारचे वतीने एपीपी श्रीमती. पांडे यांनी काम पाहीले. कोर्ट कामात पैरवी अधिकारी व कर्मचारी म्हणुन मसपोनि श्रीमती शुभांगी वाझे तर कर्मचारी सहा.फौज. श्री. शंकरराव तराळे, सुनिल डोंगरे, भवानीप्रसाद मिश्रा, पोहवा श्री. मनोज तिवारी व मधुकर आदमने पो.स्टे. नरखेड यांनी मदत केली आहे.

# विनयभंग करणाऱ्या आरोपीला कोर्टातुन शिक्षा

**पो.स्टे. खापरखेडा** :– दिनांक १२/०३/२०१८ चे १९.४७ वा. दरम्यान फिर्यादी यांच्या रिपोर्ट वरुन पो.स्टे. खापरखेडा येथे अप. क्र. १३७/२०१९ कलम ३५४ (ड), १०९ भादवी सहकलम ८, १२ बाल लैगींक अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा नोंद झालेला होता.

दिनांक १२/०३/२०१८ चे १४.३० वा. दरम्यान आरोपी क्र. १ मोहम्मद शहनशहा छुट्टन सिद्धीकी वय ३६ वर्ष याने आपले गाडी बाहेर येवून वय १६ वर्षीय पीडित/फिर्यादी मुलगी हिला 'तु माझ्या गाडीत बस' असे म्हटल्यानंतर तिने नकार दिला असता आरोपीने तिचे मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करून तिचा विनयभंग केला. आरोपी क्र. २. राजा शंकर सुर्यवंशी, वय २२ वर्ष, रा. चनकापुर त. सावनेर याने 'तु गाडीमे बेठी नही तो जानसे मारडालेंगे' अशी धमकी दिली. आरोपीला दिनांक ०२/०७/२०१८ चे १८.५८ वा. दरम्यान अटक करण्यात आली.

सदर प्रकरण्याचे तपास तत्कालीन श्रीमती मपोउपनि मिना बारंगे यांनी करून सदर प्रकरण न्याय प्रविष्ठाकरीता मा. कोर्टामध्ये सादर केले. दिंनाक ३०/०४/२०२२ रोजी मा. कोर्ट विद्यमान न्यायाधीश श्री. श्रीखंडे, जिल्हा सत्र न्यायाधिश, नागपूर यांनी वरील नमुद दोन्ही आरोपीतांना कलम ३५४ (ड) भादंवि. मध्ये ३ वर्ष सश्रम कारावास व प्रत्येकी २०००/–रु. दंड व दंड न भरल्यास २ महिने सश्रम कारावास, कलम ८ बाल लैगींक अत्याचार प्रतिबंधक कायदा मध्ये दोन्ही आरोपीतांना ५ वर्ष सश्रम कारावास व प्रत्येकी १०,०००/–रु. दंड व दंड न भरल्यास ०६ महिने सश्रम कारावास अशी शिक्षा ठोठावली आहे.

सरकारचे वतीने एपीपी श्रीमती. सोनाली राऊत यांनी काम पाहीले. कोर्ट कामात पैरवी अधिकारी म्हणुन मसपोनि श्रीमती शुभांगी वाझे तर कर्मचारी सहा.फौज. श्री. शंकरराव तराळे, सुनिल डोंगरे, पोहवा श्री. मनोज तिवारी व सिद्धार्थ गवई यांनी मदत केली आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**